भारोडी खारभूमी योजना, ता.भिवंडी, जि.ठाणे या योजनेस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांकः खाभूयो २०१२/(४१८/२०१२)/ खारभुमी
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १४ सप्टेंबर, २०१७

पहावे :-

१) मुख्य अभियंता,जलसंपदा विभाग,कोंकण प्रदेश,मुंबई यांचे पत्र क्र. मुअ/जसंविकोप्र/तां-२(१)/ /६७७५ दि. १९.१०.२०१२
२) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्रमांक व्यअस-२०१७/प्र.क्र.१२९/अर्थसं-२ दिनांक १६ जुन, २०१७.

प्रस्तावना:-

भारोडी खारभूमी योजना, ता.भिवंडी, जि.ठाणे, ही खारभूमी, योजना बृहत आराखडयात समाविष्ट नव्हती. ही योजना पुनर्वसन योजना म्हणून हाती घेण्यात आली आहे. केंद्रीय वन मंत्रालयाने किनारी नियमन अधिनियम १९९१(CRZ) अन्वये या योजनेस सूट दिली आहे. या योजनेची एकूण लांबी ४००० मी. आहे. सदर योजना उल्हास नदीच्या मुख्य खाडीच्या उजव्या तिरावर आहे. ह्या योजनेचा बांध कमकुवत असल्याने व उघाडया नादुरुस्त असल्याने शेतक-यांचे नुकसान होत असल्यामुळे ही योजना होणे गरजेचे आहे. त्याकरिता योजना तातडीने हाती घेण्याबाबत ग्राम पंचायत, लाभधारक व लोकप्रतिनिधी यांच्याकडून मागणी करण्यात आल्याने मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई यांच्याकडून संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेल्या भारोडी खारभूमी योजनेस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार सदर प्रस्तावासंदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

भारोडी खारभूमी योजना, ता.भिवंडी, जि.ठाणे या योजनेस विभागाच्या सन २०११-१२ व सा.बां.वि. दरसूची २०११-१२ या वर्षाच्या दरसूचीवर आधारित अंदाजित रू.४,८३,३४,५४९/- (रुपये चार कोटी, त्र्याऐंशी लक्ष, चौतीस हजार, पाचशे एकोणपन्नास फक्त) एवढया रकमेस याव्दारे प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. कामाकरिता रु.४,३९,४०,४९९ (रु.चार कोटी, एकोणचाळीस लक्ष, चाळीस हजार, चारशे नव्यान्नव फक्त) व अनुषंगिक कामाकरिता रु. ४३,९४,०५०/- (रु. त्रेचाळीस लक्ष, चौऱ्यान्नव हजार, पन्नास फक्त) उपशीर्षवार तरतूदीचा गोषवारा सोबतच्या

परिशिष्टामध्ये देण्यात येत आहे. व्यय अग्रक्रम समितीच्या दिनांक ३१मे, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत "सदरचा प्रस्ताव खालील अटींच्या अधीन राहून मान्य करण्यात आला आहे."

१) जलसंपदा विभागाच्या दिनांक ०२ मे, २०१७ च्या शासन निर्णयानुसार या प्रकल्पांतर्गतच्या लाभक्षेत्रास सूक्ष्म सिंचनास पूरक वितरण व्यवस्था निर्माण करण्याच्या अनुषंगाने आढावा घेऊन भूसंपादनावरील खर्चातील बचतीचा विभागाने प्राधान्याने आढावा घ्यावा.

२) चालू आर्थिक वर्षात निधी उपलब्धतेच्या अनुषंगाने नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीनंतरच प्रकल्पासाठीच्या कामांची निविदा प्रक्रिया सुरु करण्यात यावी.

३) निविदा प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी कंत्राटदारांकडून वसूल करावयाचा रु.९४.०० लक्ष इतका निधी विभागाने प्रथमत: वसूल करावा.

२. योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्रमांक आय-५, मुख्य लेखाशिर्ष "४४०२ मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च (१०२) मृद संधारण (०१) खार जमीन योजना (०१) बांधकामे (५३ मोठी बांधकामे) (४४०२०३८४)" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा व तो मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.विअप्र-१०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनियम, भाग-२ दिनांक १७.४.२०१५ "अन्वये" प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१९२/का.१४३४, दि.१५.०७.२०१३ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१८/व्यय १२, दि.०४.०२.२०१७ तसेच व्यय अग्रक्रम समितीने दि. ३१मे, २०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत दिलेल्या मंजुरीनुसार व संदर्भ क्रमांक २ नुसार याबाबतच्या निर्गमीत केलेल्या इतिवृत्तानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

४. जलसंपदा विभाग,शासन निर्णय दिनांक २२.६.२०१५ मधील अनु. क्र.२ व ३ नुसार खारभूमी योजनेचे बांधकाम सुरु करण्यापूर्वी लाभधारकांनी सहकारी संस्था स्थापन करावी व खारभूमी योजना पूर्ण करण्यासाठी पून:प्रापित क्षेत्रातील लाभधारकांकडून प्रकल्पातील सहभाग म्हणून रु. ५००/- प्रती हेक्टरखर्च (किमान रु. २००/- रोख व रु. ३००/- मजूरीच्या स्वरुपात किंवा रोखीने) घेण्यात यावे. योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर योजना देखभाल व दुरुस्तीसाठी त्यांच्याकडे हस्तांतरीत करणे आवश्यक राहील.

५. सदर कामासाठी विहित मार्गाने तरतूद अर्थसंकल्पित केल्याशिवाय त्यावर खर्च केला जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

६. या योजनेस प्रदान करण्यात आलेली प्रशासकीय मान्यता (१६५/२०१७) अनुक्रमांकावर नोंदविण्यात आली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९१४१६३०२४७७२७ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सहपत्रः- परिशिष्ट अ

Dharane Mallikarjun Irappa

Digitally signed by Dharane Mallikarjun Irappa
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42153c779eba7d6ca17364b6d37857b105b20a01d36c767c7ed1d7d278837bd7, cn=Dharane Mallikarjun Irappa
Date: 2017.09.14 16:25:26 +05'30'

(म.ई. धरणे)
शासनाचे उप सचिव

प्रतिलिपी :-

१. मा.मंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहाय्यक मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहाय्यक
४. महालेखापाल१/२, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर
५. महालेखापाल१/२, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा), मुंबई / नागपूर
६. मुख्य अभियंता, (दवप्र) व सहसचिव यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
७. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई
८. आंतर वित्त सल्लागार व उपसचिव यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
९. उपसचिव (लघु पाटबंधारे) यांचे स्वीय सहाय्यक,जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. प्रकल्प संचालक व अधीक्षक अभियंता, खारभूमी विकास मंडळ, ठाणे
११. अवर सचिव (खारभूमी), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. अवर सचिव,अर्थ शाखा १/२ (२ प्रती), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. अवर सचिव, वित्त विभाग/अर्थ-२,मंत्रालय, मुंबई
१४. संगणक कक्ष, मंत्रालय, मुंबई-३२
१५. जिल्हाधिकारी,ठाणे
१६. खारभूमी कार्यासन, संग्रहार्थ.

जलसंपदा विभाग/खारभूमी

परिशिष्ट-अ

शासन निर्णय क्रमांक खाभूयो २०१२/(४१८/२०१२)/ खारभूमी दिनांक १४/०९/२०१७ चे सहपत्र भारोडी खारभूमी योजना, ता.भिवंडी, जि.ठाणे या अंदाजपत्रकाचा गोषवारा.

अ.क्र.	उपशिर्ष	एकूण किंमत रु.
१	अे-प्राथमिक	०.००
२	बी-भूसंपादन	०.००
३	सी- माती काम	३,१०,९६,९७३.००
४	एफ(आर.एच.टी. वर्क्स)	१,१९,६४,१३९.००
५	के(इमारती)	१०,०००.००
६	एम-(वृक्षारोपण)	१०,०००.००
७	अों-(संकीर्ण)	१०,०००.००
८	पीं-(देखभाल)	१,०७,६५३.००
९	आर (दळणवळण)	७,४१,७३४.००
	एकूण	४,३९,४०,४९९.००
	अनुषंगिक खर्च १० टक्के	४३,९४,०५०.००
	एकूण	४,८३,३४,५४९.००

ठळक वैशिष्टये

पुन:प्रापित होणारे क्षेत्र	२२५ हेक्टर
प्रती हेक्टरी किंमत (रु.)	रु. २,१४,८२०/-
लाभव्यय गुणोत्तर	१.६४

Dharane
Mallikarjun
Irappa

Digitally signed by Dharane Mallikarjun Irappa
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42153c779eba7d6ca17364b6d37857b105b20a01d36c767c7ed1d7d278837bd7, cn=Dharane Mallikarjun Irappa
Date: 2017.09.14 16:26:31 +05'30'

(म.ई. धरणे)
शासनाचे उप सचिव